**मार्गदर्शक सूचना क्रमांक - ९०**

रा.भू.अ.आ.का.४/रा.स./९०/२०१८
जमाबंदी आयुक्तआणि संचालक भूमि अभिलेख,
(म.राज्य) पुणे यांचेकार्यालय
पुणे. दिनांक:-२९/१२/२०१८.

प्रति,

उपजिल्हाधिकारी तथा DDE ( सर्व )

**विषय - इतर हक्कातील वारसांची नावे भोगवटादार सदरी घेणेबाबत.**

संदर्भ - महसूल व वनविभाग शासन परिपत्रक क्र ६/१४९८/प्र.क्र./८४/ल-६ दिनांक १९ मार्च १९९८.

महोदय,

राज्यात सर्वत्र चालू असलेली ईफेरफार प्रणाली यशस्वी होण्यासाठीवेळोवेळी देण्यात आलेल्या सुचना व प्रशिक्षण वर्ग आणि कार्यशाळेत दिलेल्या सुचनांचीकाटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. महसूल विभागाकडील गाव नमुनेसंगणकीकृत करण्यापूर्वी हस्तलिखित नमुन अद्यावत करणेबाबत संदर्भिय शासनपरिपत्रक अन्वये दिलेल्या सुचनांची काही ठिकाणी अंमलबजावणी झाली नाही असेदिसून येते. त्यासाठी खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

**" हिंदू वारस कायदा ,१९५६ अनुसार वडिलार्जित मिळकतीमध्येवडिलांच्या निधनानंतर मुलींना समान हक्क प्राप्त होतात. त्यामुळे वारस नोंदी घेतानामहिला वारसांची नावे इतर अधिकार सदरी न घेता भोगवटादार सदरी घेणे योग्य वआवश्यक आहे. आता अशा सर्व वारस नोंदींची खात्री करावी. व इतर अधिकार सदरीअसलेली महिलांची नावे वाजवी ती दुरूस्तीची कार्यवाही करून भोगवटादार स दरीघ्यावी. त्यामुळे संगणकीकृत ७/१२ कायद्याप्रमाणे सुयोग्य होईल."** अशा स्वंयस्पष्टसुचना दिनांक १९ मार्च १९९८ च्या परिपत्रकामध्ये दिलेल्या असताना अजुनही काहीठिकाणी महिला वारसांची नावे इतर हक्कात दाखल आहेत हे योग्य नाही.

यासाठीसंबंधित वारस फेरफाराची खात्री करून **तहसिलदार यांनी अशा इतर वारसांची नावे भोगवटादार सदरी असलेल्या संबंधित खात्यामध्ये सामाईकात समाविष्ट करणेसाठीमुळे वारस फेरफारावरुन व अन्य कागदपत्रावरुन खात्री करुन सर्व संबंधितांची बाजू ऐकून घेऊन आदेश पारीत करावेत** व अशा आदेशाने ईफेरफार या प्रणालीतुन **आदेशाने खात्यात नांव समाविष्ट करणे** या फेरफार प्रकारातून सदरची दुरुस्ती करण्यात यावी म्हणजे यापुढे ऑनलाईन दस्त नोंदणीला व अन्य फेरफार घेण्यासाठी अडचणी उद्भवणार नाहीत. तथापि त्यापूर्वी सर्व संबंधितांना सुनावणीची संधी द्यावी. जर या पूर्वीच हक्कसोड पत्र, बक्षीसपत्र, वाटणीपत्र झाले असल्यास त्याचाही विचार करणेत यावा. अनेक वेळा इतर अधिकारामध्ये इतर वारसांची नावे असताना खरेदी विक्री दस्त होवून जमिनीचे हस्तांतरण झाले आहे व असा दस्त नोंदविताना अथवा असा फेरफार मंजूर करताना नमुना ९ च्या नोटीस वर इतर वारसाची संमती देखील घेतलेली असते तरीही मंजूर फेरफार प्रमाणे इतर वारसाची नावे कमी/कंस केली जात नाहीत, त्यामुळे अशी नावे पोकळीस्त ठरतात त्यामुळे योग्य ती खात्री करून अशी नावे देखील कमी करणे आवश्यक आहे.

सदरच्या सूचना सर्व वापरकर्ते यांचे निदर्शनास आणाव्यात ही विनंती.

आपला विश्वासू,

**( रामदास जगताप )**
**राज्यसमन्वयक, ई-फेरफारप्रकल्प**
**जमाबंदी आयुक्त कार्यालय (म.राज्य) पुणे.**

प्रत - १) उपआयुक्त ( महसुल ), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
२) उप विभागीय अधिकारी (सर्व)